Literacy for a Billion

Movie: Tujhi majhi jamli jodi
Year: 1990

Song: Hrudayi tula bharuni
Lyricist: Vilas, Pravin Davane

हृदयी तुला भरूनी
घेते मिटून डोळे
सजणा तुझीच झाले
माझे मला मिळाले
हृदयी तुला भरूनी
घेते मिटून डोळे
सजणा तुझीच झाले
माझे मला मिळाले
हृदयी तुला भरूनी

दाही दिशातूनी रे
चेहरा तुझा दिसावा
माझ्या तुझ्या मिठीने
उतरून स्वर्ग यावा
ते सूर ओळखीचे डोळयातूनी जुळाले
हृदयी तुला भरूनी
घेते मिटून डोळे
सजणा तुझीच झाले
माझे मला मिळाले
हृदयी तुला भरूनी

बहरून प्रीत येता
एकांत जागतो हा
हळूवार धुंद वारा
श्रृंगार छेडतो हा
पायी तुझ्याच मजला
सर्वस्व रे मिळाले
हृदयी तुला भरूनी
घेते मिटून डोळे
सजणा तुझीच झाले
माझे मला मिळाले
हृदयी तुला भरूनी

तुज पाहता जीवाची
हलकेच रात्र मिटते
होता पहाट वेडी
तुजलाच मी पाहते
प्रेमात राजसाच्या
हरवून मीच गेले
हृदयी तुला भरूनी
घेते मिटून डोळे
सजणा तुझीच झाले
माझे मला मिळाले
हृदयी तुला भरूनी
घेते मिटून डोळे
सजणा तुझीच झाले
माझे मला मिळाले
हृदयी तुला भरूनी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*